CMYK

उबाठा अंतर्गत गटबाजीमुळे डॉ. संजय रायमुलकर विजयाचा चौकार लगावण्याची शक्यता, चर्चेला उधान >> पान 2

कोकणात २९ हजार ५५० कोटींची मोठी गुंतवणूक >> पान 3

स्त्रीशक्तीच बदल घडविणार - सुषमाताई अंधारे >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
माणसाच्या आयुष्यातील संकट ही यशाचा आनंद घेण्यासाठी आवश्यक आहेत.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 59 ■ शनिवार, दि. 05 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




आलिया भट्टच्या 'जिगरा'ची मिळाली सर्व माहिती

आतील पान

# जिल्ह्यातील कृषी, सिंचन, औद्योगिक विकासाला प्राधान्य देणार - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, उद्योजक, खेळाडू आणि पत्रकारांसोबत राज्यपालांचा संवाद

## जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी विशेष मोहीम राबवावी

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एकत्रितपणे काम करावे

## सिंचन प्रकल्पांना निधी देण्याची शासनाला सूचना

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** जिल्ह्यात रस्ते, दळणवळण व्यवस्था, पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. जिल्ह्यातील कृषी, सिंचन, औद्योगिक विकासाला प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्यातील विविध जिल्ह्यांच्या दौऱ्यावर असलेले राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे शुक्रवारी बुलढाण्यात आले होते. या दौऱ्यादरम्यान त्यांनी शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, उद्योजक, पत्रकार, खेळाडू आणि सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत जिल्ह्यातील विविध विषयांवर चर्चा करुन शासनाच्या उपाययोजना सांगितल्या. यावेळी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण, आयुष (स्वतंत्र प्रभार) राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय रायमुलकर, आमदार संजय गायकवाड, आमदार श्र्वेता महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात , पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, माजी मंत्री सुबोध सावजी, माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ, राहूल बोंद्रे, नानाभाऊ कोकरे, विविध राजकीय पक्ष व सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, बुलढाणा जिल्ह्याचा औद्योगिकदृष्ट्या विकास करण्यासाठी जिल्ह्यात उद्योग वाढले पाहिजेत. जिल्ह्यात उद्योग प्रकल्प सुरु होणे गरजेचे असून त्यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना राज्य शासनाला करणार आहे. जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात उद्योगासाठी जागा दिली जात आहे. स्थानिकांना उद्योग सुरु करण्याची संधी आहे. उद्योगातून जिल्ह्याचे सकल उत्पन्न वाढीस मदत होईल. तसेच मोठ्याप्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, असेही राज्यपालांनी सांगितले.





### माझी लाडकी बहीण योजना सर्वाधिक यशस्वी

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने सुरु केलेली माझी लाडकी बहीण योजना सर्वाधिक यशस्वी ठरल्याचे मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी विविध घटकांशी संवाद साधतांना व्यक्त केले.

जिल्ह्यातील विविध घटकांशी चर्चा केल्यानंतर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन पुढील नियोजित कार्यक्रमासाठी अकोलाकडे रवाना झाले.

**शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एकत्रितपणे काम करावे**

मी एक शेतकरी कुटुंबातील आहे. शेतकरी आत्महत्येबाबत राज्य शासन गांभीर्याने उपाययोजना करीत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे मुळ कारण शोधून उपाययोजना करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे समुपदेशन केले जात आहे. त्यासाठी मोबाईल क्लिनिक सुरु केले आहेत. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना राज्यपाल राधाकृष्णन यांनी केल्या. तसेच शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बी- बियाणे उपलब्ध होण्यासाठी तपासणी, दर्जाबाबत कडक कारवाई करण्याच्या सूचना केंद्र सरकार केल्या जातील, असे राज्यपाल यावेळी म्हणाले.

**बुलढाण्यातील सिंचन प्रकल्पांना निधी देण्याच्या सूचना शासनाला देणार**

जीगाव सिंचन प्रकल्प हा जिल्ह्यातील सिंचन क्षमता पूर्ण करणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. हा प्रकल्प टप्प्याने पूर्ण करण्यात येणार आहे. पहिला टप्पा पूर्णत्वास येत आहे. जिल्ह्यातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी जीगाव, वैनगंगा- नळगंगा नदीजोड सिंचन प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या राज्य शासनाला सूचना देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील निर्यातदारांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करण्यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल. निर्यातदारांना देयकांसाठी मुंबईच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे या देयकांसाठी स्टेट बॅकेची एक सेल सुरु करण्यासाठी केंद्र सरकारला सूचना पाठवल्या जातील.

बुलढाणा जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालय अंतिम टप्प्यात आहे. जिल्हा रुग्णालयात रुग्णांना सुविधा दिल्या जात आहेत. पुरवठ्याच्या तुलनेत डॉक्टर्सची मागणी मोठ्याप्रमाणात आहे. त्यासाठी वैद्यकीय महाविद्यालय महत्त्वाचे आहे. तसेच जिल्हा रुग्णालयात दिव्यांगाना सर्व सुविधा देण्यासाठी विशेष केंद्र सुरु करण्यात आले असून त्याचा लाभ घ्यावा. खेळाडूंसाठी जिल्हा नियोजन आराखड्यात निधीची तरतूद करावी. खामगांव- जालना रेल्वे मार्गासह शेगाव- पुणे रेल्वे मार्गासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल, अशा सूचना देखील राज्यपाल यांनी यावेळी दिल्या.

## दहावीच्या विद्यार्थ्यांनो तयारीला लागा! 'या' तारखेपासून सुरु होणार परीक्षेची अर्ज प्रक्रिया

**मुंबई/ प्रतिनिधी :** दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या दहावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार येत्या काही दिवसांतच दहावीचे विद्यार्थी परिक्षेसाठी अर्ज करु शकणार आहेत.

राज्य मंडळाने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, ७ ऑक्टोबर २०२४ पासून अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरूवात होणार आहे. तर ५ नोव्हेंबर ही अर्ज करण्याची अंतिम तारीख असणार आहे. दरम्यान, दहावीचे विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज www.mahahsscboard.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने शाळा प्रमुखांमार्फत भरण्यात येतील.




## अखेर हर्षवर्धन पाटलांनी फुंकली तुतारी!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/ प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक ही आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. अशातच आज भाजपामधील दिग्गज नेते हर्षवर्धन पाटील यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.



इंदापूर विधानसभा मतदारसंघात अजित पवार गटाचे दत्तात्रय भरणे हे आमदार आहेत. त्यामुळे हा मतदारसंघ भाजपाला सोडण्यास राष्ट्रवादी काँग्रेस तयार नसल्याने हर्षवर्धन पाटील यांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, काल शरद पवार यांची आणि माझी सिल्वर ओकला बैठक झाली. त्यामध्ये शरद पवार मला म्हणाले इंदापूरमधील अनेक लोकांचे मत आहे की तुम्ही निवडणूक लढवा. त्यामुळे तुमच्या लोकांशी चर्चा करुन तुम्ही निर्णय घ्या, त्या पुढची जबाबदारी माझी, असे पवार आपल्याला म्हणाल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच, शरद पवार यांच्याशी चर्चेअगोदर मी देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चर्चा केली आहे. त्या चर्चेत फडणवीस यांनी आपली अडचण समजून घ्या, असे म्हटल्याचेही पाटील यांनी यावेळी सांगितले.

## अजित पवारांना आणखी एक मोठा धक्का, विद्यमान आमदार साथ सोडणार!

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/ प्रतिनिधी :** सलग सहा वेळा मोठ्या मताधिक्क्याने माढा विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेले अजितदादा गटाचे जेष्ठ आमदार बबनदादा शिंदे यांनी यावेळी मात्र अजितदादांकडे पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. यावेळी ते आपल्या मुलाला निवडणूक रिंगणात उतरवत असून त्यांनी शरद पवारांची यासंदर्भात अनेक वेळा भेट घेतली आहे. कार्यकर्त्यांनी शरद पवार यांचेकडे रणजीत शिंदे यांच्यासाठी उमेदवारी मागितली असून जर साहेबांनी उमेदवारी दिली नाही तर आपण मुलाला अपक्ष उभा करू अशी भूमिका घेतल्याने आता अजितदादांच्या अडचणीत वाढ होणार आहे. महायुतीतील तुमचं फिक्स तिकीट का नाकारता या विषयावर त्यांनी तो विषय आता संपलेला आहे, अशा एका वाक्यात उत्तर देत अजितदादा व महायुतीला निरोप दिला.

आमदारांचे पुतणे धनराज शिंदे हे बंडखोरी करत असल्याचे निर्दर्शनास सांगताच आमचा घरचा विषय ही संपला असल्याचे आमदार शिंदे यांनी सांगितले. भाजप आमदार रणजीत सिंह मोहिते पाटील देखील तुतारी कडून निवडणूक लढवण्यास प्रयत्नात असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत, निवडणुकीत कोणीही येऊ दे आम्हाला फरक पडणार नाही, अशी भूमिका आमदार शिंदे यांनी स्पष्ट केली. काही दिवसापूर्वी अजितदादांची जन सन्मान यात्रा माढ्यात आली असता बबनदादा शिंदे यांनी त्यास हजेरी लावत मोठे शक्ती प्रदर्शनी केले होते. आता



शरद पवारांकडे उमेदवारी मागितल्याने अजित पवार यांना माढ्यात कोणाला उभे करायचे हा प्रश्न पडणार आहे.

शरद पवार यांनी रणजीत शिंदे यांना तुतारी न दिल्यास राष्ट्रवादी अर्थात घड्याळावर उभे न राहता अपक्ष निवडणूक रिंगणात उतरवण्याची भूमिका बबनदादांनी घेतल्याने आता अजितदादांच्या घड्याळाचा उमेदवार कोण हा प्रश्न पुन्हा अनुत्तरीत राहणार आहे. काही दिवसांपूर्वी अजितदादांसोबत माढा आणि करमाळा या दोन्ही ठिकाणी स्टेजवर दिसणारे आमदार बबनदादा शिंदे यांनी आता मात्र तुतारी न मिळविल्यास अपक्ष मुलाला उतरवणार अशी भूमिका घेतल्याने बबन दादांचा अजित पवार यांच्यावरील विश्वास संपला का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आमदार शिंदे यांचे दुसरे बंधू आणि करमाळ्याचे विद्यमान आमदार संजय मामा शिंदे यांनी यापूर्वीच गेल्यावेळी प्रमाणे आपण याही वेळी अपक्ष निवडणूक लढविणार असल्याची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे, अजित दादांना आता या दोन्ही मतदारसंघात राष्ट्रवादीचा अधिकृत उमेदवार कोण द्यायचा हा पेच निर्माण होणार आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील राजकारण चांगलंच वळणं घेत असून माढा, मोहोळ, करमाळा आणि पंढरपूर- मंगळवेढा मतदारसंघात चुरशीच्या लढतींपूर्वीच उमेदवारीवरुन चांगलीच रस्सीखेंच पाहायला मिळत आहे. तर, शरद पवार यांनी म्हटल्याप्रमाणे एकामागून एक धक्के ते देताना दिसून येतात.

# गड किल्ल्यांवर दारू, ड्रग्जचे सेवन केल्यास २ वर्षे शिक्षा, १ लाख रुपये दंड; मंत्रिमंडळ निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** राज्यातील गड किल्ल्यांचे संवर्धन आणि सुभोशीकरण हा नेहमीच सामाजिक व राजकीय चर्चेचा विषय असतो. त्यामुळे, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला दिलेली विरासत म्हणजे हे गड किल्ले आहेत. आजही जगभरातील पर्यटकांचं आकर्षण आणि शिवरायांच्या शौर्याची साक्ष, रक्तरंजीच लढायांचा इतिहास हे गड किल्ले सांगतात. त्यामुळे, महाराष्ट्राचं आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्यांबद्दल प्रत्येकाच्या मनात आदराचं स्थान आहे. मात्र, यापूर्वी काही किल्ल्यांवर मद्यपान,ड्रग्ज घेतल्याच्या घटना आढळून आल्या आहेत. व्यसनाधी तरुणाई गड किल्ल्यांवरील मोकळ्या जागेत असेल कृत्य करतात. आता, शासनाने या कृत्याला कायदेशीर लगाम लावला आहे. याबाबत सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी माहिती दिली.

विधानसभा निवडणुकांच्या आचारसंहितेपूर्वी राज्य सरकारच्या कॅबिनेट बैठकांचा व निर्णयांचा धडाकाच सुरू आहे. गेल्या ४ दिवसांत तब्बल ७८ शासन निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत. त्यात, आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ४१ विषयांना कॅबिनेटमध्ये मंजुरी दिलीय. त्यामध्ये, गोड्या पाण्यातील मच्छिमारांसाठी तसेच सागरी मच्छिमारांसाठी महामंडळ स्थापन केले जाणार आहे. तर, महत्वाचा निर्णय म्हणजे, गड किल्ल्यांची सुरक्षा व संवर्धन हा आहे. गड किल्ल्यांवर दारू, ड्रग्ज घेतल्यास यापुढे २ वर्षाची शिक्षा व १ लाख रुपयांचा दंड आकारला जाईल, अशी माहिती मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. तसेच, राज्य सरकारने आज ४१ निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

**शरद पवार ५५ वर्षे सत्ते होते**

शरद पवार हे स्वत: ५५ वर्षे सत्तेत असताना त्यांनी ही कृती केली नाही. आता, निवडणूक तोंडावर आल्यावर ते मागणी करतात, यातून व्यावसायिक राजकारणी ते दिसतात. नॅरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न आहे, असे म्हणत शरद पवार यांनी आरक्षणाची मर्यादा वाढविण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी प्रतिक्रिया देत टोला लगावला.



**कुणी निर्देश तर दिले नाहीत ना - मुनगंटीवार**

चर्चेतून प्रश्न सुटतो असं झिरवळ साहेब सभागृहात म्हणताय. पण, संविधानिक पदावर असताना असे करण्याचे कारण काय? त्यांनी उडी का मारली. निवडणूक आल्यामुळे केले असेल तर योग्य आहे. पण, हे सरकार आदिवासींच्या पाठिशी उभे आहे, असे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले. तसेच, उपाध्यक्षांनी बोलवल्यावर मुख्यमंर्त्यांना जावे लागते. निवडणूक लक्षात घेवून आंदोलन करतात. कुणी निर्देश तरी दिले नाहीत ना, असा सवालही मुनगंटीवार यांनी उपस्थित केला.

CMYK

## तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन. स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल – क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्र्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# उबाठा अंतर्गत गटबाजीमुळे डॉ. संजय रायमुलकर विजयाचा चौकार लगावण्याची शक्यता, चर्चेला उधान

## उबाठात अनेक उमेदवार इच्छुक : महाविकास आघाडीचाही नाही ताळमेळ




**मेहकर :** गेल्या तीन टर्मपासून मेहकर मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. मतदारांनी मतदारांनी आपले मते शिवसेनेला देत येथील शिवसेनेच्या उमेदवाराला विधानसभेत पाठवले आहे. तब्बल तीन वेळा शिवसेनेचा उमेदवार या ठिकाणी निवडून आल्याने मेहकर मतदार संघ हा शिवसेनेचा कायम बालेकिल्ला राहिला आहे. मात्र, दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत पडलेल्या फुटीने आता शिवसेनेत दोन गट पडले आहेत. शिंदे सेना व उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची सेना अशी शिवसेना विभागली गेली आहे. असे असले तरी शिवसेनेचा मतदार मात्र मूळ शिवसेनेची कायम आहे. मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेकडून अनेक उमेदवार हे इच्छुक असल्याने त्यांचा ताळमेळ नसल्याची खमंग चर्चा आहे. तसेच महाविकास आघाडीतही कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसल्याने यावेळेसही ही जागा शिंदेसेना बळकवून आमदार डॉ.संजय रायमुलकर हे विजयाचा चौकार लगावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मेहकर मतदार संघात बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावंत




शिवसैनिक आहेत.त्यामुळे गेल्या तीन टर्मपासून हा मतदारसंघ शिवसेनेचा कायम बालेकिल्ला राहिला आहे. गत दोन वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेच्या वाट्याला शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह गेले आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे अर्थात उबाठा शिवसेना निर्माण करून मशाल चिन्ह घेतले आहे. मेहकर मतदारसंघ हा कायम शिवसेनेचा असला तरी आता शिवसेना दोन ठिकाणी विभागल्या गेल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. शिवसेनेत शिंदे गटाकडून आमदार डॉ.संजय रायमुलकर यांना पुन्हा विधानसभेची उमेदवारी जवळपास निश्र्चित असल्याचं सूत्रांकडून माहिती मिळत आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेकडून मात्र अद्याप उमेदवारांच्या नावाची घोषणा झाली नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून अनेक उमेदवार हे इच्छुक असल्याने मतदारही संभ्रमात पडले आहेत. त्याचबरोबर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, महाविकास आघाडी यांच्यातही अंतर्गत...ताळमेळ नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आमदार डॉ. संजय रायमुलकर हे याच संधीचा फायदा घेत विजयाची चौकार मारण्याची शक्यता नाकारता येत नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून सिद्धार्थ खरात सह अनेक जण उमेदवारीसाठी इच्छुक असल्याने व ज्यांना उमेदवारी मिळेल त्यांना इतर इच्छुक उमेदवार सहकार्य करतील की नाही हा ही प्रश्न असल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हातून मेहकर विधानसभा मतदारसंघाची




जागा गेल्यास नवल वाटू नये,अशी राजकीय चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची सुद्धा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबत यांच्या शिवसेनेबाबत सहकार्याची भूमिका नसल्याचे वास्तव चित्र मेहकर मतदार संघात दिसून येत आहे. एकंदरीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना व महाविकास आघाडीतील नियोजन शून्य कारभार व अंतर्गत बंडाळीने मेहकर मतदार संघातील जागा हाताची जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर महाविकास आघाडी व उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत असलेल्या अंतर्गत कडबाजीचा फायदा घेत आमदार संजय रायमलकर हे पुन्हा विजयाची चौकार लगावतील यात काही शंका नाही असे मत राजकीय तज्ञाकडूनही व्यक्त केले जात आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेसोबत मतदार संघातील शिवसैनिक कायम असले तरी, अंतर्गत गटबाजी व महाविकास आघाडीतील असहकार्याची भूमिका ही कोणाच्या पथ्यावर पडते हे मात्र आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीतून दिसून येणार आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## एमबीबीएस प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आनंदाची बातमी

# पहिल्या फेरीत प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीत प्रवेश निश्चितीबाबत ६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** दुसऱ्या फेरीत एमबीबीएस प्रवेशासाठी निवड झालेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांना पहिल्या फेरीतील प्रवेश रद्द करण्यासाठी आणि राज्यस्तरावरील दुसऱ्या यादीतील महाविद्यालयात प्रवेश निश्र्चितीसाठी केंद्र सरकारने ६ ऑक्टेबर पर्यंत मदत वाढ दिली आहे अशी माहिती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे.

एमबीबीएस प्रवेशाची पहिली देशपातळीवरील यादी जाहीर झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्र्चित केले होते त्यानंतर राज्यस्तरावरील दुसरी प्रवेश फेरी जाहीर झाली परंतु महाराष्ट्रात काही तांत्रिक कारणामुळे ही दुसऱ्या फेरीची



प्रवेशित यादी २७ सप्टेंबरला लागणे अपेक्षित होते मात्र ही यादी ३० सप्टेंबरच्या रात्री ८ वाजता प्रकाशित झाली तर देश पातळीवर पहिल्या यादीतील प्रवेश रद्द करण्याची शेवटची तारीख ही १ ऑक्टोबर अशी होती त्यामुळे महाराष्ट्रातील एम बी बी एस च्या प्रवेशित विद्यार्थ्यांना पूर्वीच्या पहिल्या यादीतील प्रवेश रद्द करण्यासाठी केवळ एक दिवसाचा कालावधी मिळाला होता एका दिवसात पूर्वीचा प्रवेश रद्द करून राज्य स्तरावरील प्रवेशित ठिकाणी प्रवेश घेणे शक्य नव्हते ही समस्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी केंद्रीय आयुष आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे सांगीतली मंत्री महोदयांनी एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांची ही समस्या केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नडडा यांच्या निदर्शनास आणून दिली हा कालावधी वाढवून देण्यात यावा अशी आग्रही मागणी केली त्यानुसार एम सी सी एन ने यासंदर्भाचे परिपत्रक काढले आहे त्यानुसार आता एमबीबीएससाठी पहिल्या यादीत प्रवेश निश्र्चित झालेल्या विद्यार्थ्यांना तो प्रवेश रद्द करून दुसऱ्या यादीतील महाविद्यालयात प्रवेश घेण्याची मुदत आता ६ ऑक्टोबर पर्यंत वाढविण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय आयुष आरोग्य कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे


## आलिया भट्टच्या 'जिगरा'ची मिळाली सर्व माहिती

**मुंबई/ प्रतिनिधी :** आलिया भट्ट आणि वेदांग रैना स्टारर 'जिगरा' हा चित्रपट सतत चर्चेत आहे. या चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यानंतर लोकांनी रिलीज होण्याआधीच हा चित्रपट मोठा हिट मानला आहे. आलिया भट्टची झलक पाहिल्यानंतर सर्वजण या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रतीक्षा करत आहेत. 'जिगरा'बद्दल चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता आहे. दरम्यान, या चित्रपटाशी संबंधित काही गोष्टी समोर आल्या आहेत. आलियाच्या चित्रपटाला सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन कडून U/A प्रमाणपत्र मिळाले आहे.

या प्रमाणपत्राचा अर्थ असा आहे की आलिया भट्टचा हा चित्रपट लहान मुलेही पाहू शकतात. चित्रपटाचा रन टाइम १५५ मिनिटे निश्र्चित करण्यात आला आहे. ही माहिती CBFC च्या वेबसाइटवर उपलब्ध आहे, जिथे U/A रेटिंगसह, 'जिगरा'ची प्रमाणित लांबी १५५ मिनिटे म्हणजेच २ तास ३५ मिनिटे असल्याचे नमूद केले आहे. चाहत्यांमध्ये चर्चा कायम ठेवण्यासाठी निर्माते चित्रपटाशी संबंधित गोष्टी शेअर करत आहेत. चित्रपटाचे 'तेनू संग रखना' हे गाणे ३ ऑक्टोबर रोजी रिलीज झाले.

वरुण ग्रोवरने लिहिलेले हे भावनिक गाणे आहे. या गाण्याला अरिजित सिंग, अनुमिता नादेसन आणि अचिंत ठक्कर यांनी आवाज दिला आहे. निर्मात्यांनी या गाण्याचे 'जिगरा'चे हृदय आणि आत्मा असे वर्णन केले आहे. या चित्रपटातील गाण्यात भाऊ आणि बहिणीचे सुंदर नाते दाखवण्यात आले आहे. चित्रपटातील आलिया भट्टच्या पात्राचे नाव सत्या आहे. या गाण्याआधी आलिया आणि दिलजीत दोसांझचे गाणे रिलीज झाले होते.

आलिया भट्ट आणि दिलजीत दोसांझचा 'चल कुडिए' हे गाणे खूप पसंत केले जात आहे. या चित्रपटाबाबत असेही बोलले जात आहे की, आलियाने इंडस्ट्रीतील बड्या नायकांना टक्कर देण्याचे ठरवले आहे. याशिवाय ती YRF स्पाय युनिव्हर्सच्या 'अल्फा' या सिनेमातही काम करत आहे. या चित्रपटात ती जबरदस्त क्शन करताना दिसणार आहे.



# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी व नमो शेतकरी महासन्मान निधी योजनांच्या निधीचे ५ ऑक्टोबरला वितरण–कृषी मंत्री धनंजय मुंडे

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** पी.एम. किसान सन्मान निधी योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी या योजनांचे माहे ऑगस्ट २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीतील अनुक्रमे १८ वा व पाचवा हप्ता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवार ०५ ऑक्टोबर, २०२४ रोजी सकाळी १०.०० वा. वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी (ता.मानोरा) येथील निधी वितरण समारंभात करण्यात येणार आहे. या समारंभास राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, यवतमाळ –वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

शेतक–यांना निश्र्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/– प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/– त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहेत. पी. एम. किसान योजने अंतर्गत दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ अखेर राज्यातील जवळपास १.२० कोटी शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यावर एकूण १७ हप्त्यांमध्ये सुमारे रू. ३२००० कोटीचा लाभ जमा झालेला आहे.

पी. एम. किसान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात सन २०२३–२४ पासून नमो शेतकरी महासन्मान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजनेच्या १४ व्या हप्त्यापासून पुढील प्रत्येक हप्ता वितरणावेळी लाभ देण्यात आलेल्या राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ अदा करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने २०२३–२४ व २०२४–२५ या आर्थिक वर्षात एकूण चार हप्त्यांमध्ये एकूण ९१.४५ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रु. ६९४९.६८ कोटी लाभ अदा करण्यात आला आहे. जून २०२३ पासून आयोजित गावपातळीवरील विशेष मोहिमांद्वारे पी. एम. किसान योजनेच्या लाभासाठी बंधनकारक असलेल्या बाबींची २० लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पूर्तता झाल्याने देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबांची संख्या आज रोजी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरली आहे.

केंद्र शासनाच्या पी. एम. किसान योजनेच्या १८ व्या हप्त्याच्या लाभ वितरणावेळी राज्यातील भूमि अभिलेख नोंदी अद्ययावत केलेल्या, बँक खाती आधार संलग्न केलेल्या व ईकेवायसी पूर्ण केलेल्या एकूण ९१.५२ लाख शेतकरी कुटुंबांच्या बँक खात्यात रू. १९०० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ तर राज्याच्या योजनेमधून रू. २००० कोटीहून अधिक रक्कमेचा लाभ शेतकऱ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे.

या समारंभामध्ये पी. एम. किसान योजने अंतर्गत रू. २०००/ तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत रू. २०००/ असा एकूण ४००० रुपये चा लाभ प्रधानमंत्री महोदयांच्या हस्ते राज्यातील सुमारे ९१.५२ लाख पात्र शेतकरी कुटुंबांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होईल. पी. एम. किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधीच्या लाभ वितरण समारंभात https://pmindiawebcast.nic.in या लिंकआधारे राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# कोकणात २९ हजार ५५० कोटींची मोठी गुंतवणूक

## ३८ हज़ार नोकऱ्या निर्माण करणाऱ्या प्रकल्पांना मंत्रिमंडळ उपसमितीची मंजुरी

## उद्योगमंत्री उदय सामंत यांची उद्योग भरारी !

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील ,रत्नागिरी तालुक्यात एमआयडीसी क्षेत्रांमध्ये दोन प्रमुख प्रकल्पांसाठी मंत्रिमंडळाच्या उपसमितीने आज मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांमुळे कोकणात २९५५० कोटींची गुंतवणूक होणार असून, सुमारे ३८ हजार नोकऱ्यांची निर्मिती होणार आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या प्रयत्नांमुळे सिलिकॉन वेफर्स आणि चिप्स च्या निर्मितीत अग्रेसर असलेल्या वेल्लोर इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी पार्क प्रा. लि. तसंच रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपन्यांनी गुंतवणुकीसाठी रत्नागिरी जिल्ह्याची निवड केली आहे.



वेल्लोर इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी पार्क प्रायव्हेट लिमिटेड वेल्लोर इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी पार्क हा उच्च तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प असून, डळश्रळलेपु रषशीी आणि चिप्सचे उत्पादन जागतिक स्तरावर करणार आहे. बंद पडलेल्या स्टरलाइट कंपनीच्या ५५० एकर जागेचा वापर करून हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे, ज्यामुळे औद्योगिक पुनरुज्जीवन होईल.

मेड इन इंडिया या अंतर्गत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताचे स्थान अधिक मजबूत करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. या प्रकल्पामध्ये एकूण १९,५५० कोटी रूपयांची भांडवली गुंतवणूक होणार असून ५६२० प्रत्यक्ष तर २८ हजार अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनवण्यासाठी केंद्र सरकारचे विशेष प्रयत्न सुरू आहेत. त्या अनुषंगाने रत्नागिरी मध्ये येत असलेला हा प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहे.

मंत्रिमंडळाच्या उपसमितीने आज रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड च्या संरक्षण क्षेत्राशी निगडीत प्रकल्पालाही मान्यता दिली आहे. भारताच्या संरक्षणसिद्धतेच्या दृष्टीकोनातून महत्वाचा असलेला हा प्रकल्प रत्नागिरीत होत असल्याने कोकणाच्या अर्थव्यवस्थेलाही गती मिळणार आहे. संरक्षण क्षेत्राला लागणाऱ्या शस्त्र-शस्त्रास्त्रांची निर्मिती करणाऱ्या या प्रकल्पासाठी दहा हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे, तर ४५०० प्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.

कोकणात नाविन्यपूर्ण उद्योग यावेत यासाठी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी जगभरात मोठी मोहीम केली होती. मेक इंडिया मोहीमेला बळ देण्यासाठी भारतीय उद्योजकांना ही मोठ्या गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण दिले पाहिजे असं धोरण स्विकारून उदय सामंत यांनी रणनिती आखली होती. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून सलग दोन वर्षे महाराष्ट्र देशी-विदेशी गुंतवणुकीत क्रमांक एकचं राज्य ठरले आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये समप्रमाणात उद्योग गेले पाहिजेत यासाठी शासनाने यंदा जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत, त्या अनुषंगाने पहिल्यांदाच गडचिरोली सारख्या जिल्ह्यातही मोठी गुंतवणूक पाहावयास मिळाली.

कोकणातील बंद पडलेल्या स्टरलाइट इंडस्ट्रीजच्या ५५० एकर जागेचा योग्य उपयोग होऊन रोजगारनिर्मिती व्हावी यासाठी प्रयत्नरत असलेल्या उदय सामंत यांनी स्टरलाइट ची जागा ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला होता. उद्योगांची निर्मिती सोबत वादात सापडलेल्या उद्योगांच्या समस्यांचा निपटारा करण्यावर उदय सामंत यांनी भर दिल्याने अनेक मोठे उद्योग महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी पुढे येत आहे. सेमीकंडक्टर आणि संरक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांनी राज्यात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतल्याने या नवीन क्षेत्रातही महाराष्ट्राचा दबदबा तयार होईल असा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे.

## केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव साईचरणी लीन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री, रेल्वे, माहिती व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान, भारत सरकार अश्विनी वैष्णव, यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांचा श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से. यांनी सत्कार केला. यावेळी श्री साईबाबा संस्थानचे जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आदी उपस्थित होते.

## सोनार समाज विकास महामंडळाची स्थापना!

### केंद्रीय राज्यमंत्री जाधव व आमदार रायमुलकर यांचा शहरात जंगी सत्कार : मेहकरात सोनार समाज बांधवांनी केला आनंदोत्सव साजरा



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/ प्रतिनिधी :** अनेक वर्षापासून असलेल्या सोनार समाज बांधवांच्या वतीने करण्यात येत असलेल्या मागणीला महाराष्ट्र शासनाने हिरवी झेंडी दाखवून सोनार समाज विकास महामंडळाची स्थापना केली. त्याबद्दल मेहकर शहरातील सोनार समाज बांधवांनी मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला. तर शासनाच्या या निर्णयाबद्दल दि.४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व आ.संजय रायमुलकर यांचा सत्कार केला.

सोनार समाजातील दुर्लक्षित घटकांच्या विकासासाठी सोनार समाजासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्रातील समाज बांधवांकडून अनेक वर्षापासून केली जात होती.आता महायुती सरकारने सोनार समाज विकास महामंडळाचे घोषणा केल्याने समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.शासनाच्या या धाडसी निर्णयाबद्दल मेहकर शहरातील सुवर्णकार समाज बांधवांनी दि.४ ऑक्टोबर रोजी केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आ. संजय रायमुलकर यांचा राम मंदिर येथे सत्कार केला.समाज बांधवांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,अजित पवार यांच्यासह राज्य शासनाचे आभार मानले. सुवर्णकार समाज बांधवांनी गुलाल उधळत मिठाई वाटून आनंद साजरा केला. यावेळी अखिल भारतीय सोनार समाज फेडरेशनचे अध्यक्ष मोहन हिवरकर, संत नरहरी समाज मंडळाचे सुनील निंबेकर, सुधीर सारोळकर ,सुरेश खंदारकर ,शेखर काटकर ,संदीप सावरकर, विठ्ठल खंदारकर ,नंदकिशोर नंदनकर ,गजानन नागपूरकर ,गणेश दुरतकर ,रमेश काटकर, प्रशांत महामुने, कैलास अर्धापूरकर ,आनंद काटकर ,अमोल काटकर, दत्ता नवले, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश वाळूकर आदींची उपस्थिती होती.

## आरोग्य सेवक व कंत्राटी ग्रामसेवकांना नियुक्ती पत्र देऊन केले समुपदेशन

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत आरोग्य सेवक (महिला) व ग्रामपंचायत विभागाअंतर्गत कंत्राटी ग्रामसेवक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जिल्हा निवड समितीने पात्र ठरलेल्या उमेदवारांचे पदस्थापनेची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडणेकरिता ३ ऑक्टोबर रोजी समुपदेशन शिबीर आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी कर्मचारांना नियुक्ती व पदस्थापना आदेश देऊन समुपदेशन करण्यात आले.

जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत आरोग्य सेवक(महिला) एकूण १९९ पदांची जाहिरात दिली होती. त्यापैकी जिल्हा निवड समितीने पात्र ठरविलेल्या ९१ उमेदवारांना आरोग्य सेवक ( महिला) या पदावर नियुक्ती देणे. तसेच जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाअंतर्गत कंत्राटी ग्रामसेवक संवर्गाची ३६ पदांची जाहीरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यापैकी जिल्हा निवड समितीने पात्र ठरविलेल्या ३३ उमेदवारांना कंत्राटी ग्रामसेवक या पदावर नियुक्ती देऊन दोन्ही संवर्गातील उमेदवारांना पदस्थापना देण्यासाठी समुपदेशन शिबीर आयोजन करण्यात आले होते. समुपदेशनामध्ये पदस्थापनेसाठी निवड केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र व पंचायत समितीमध्ये रुजु होणेकरीता समुपदेशन शिबीरामध्येच नियुक्ती व पदस्थापना आदेश निर्गमित केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी. एंडोले (सामान्य), उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य) संजय इंगळे, जिल्हा आरोग्य अधिकारी अमोल गिते आदी उपस्थित होते.

## शेती नावाने कर नाही तर मर असे म्हणत कुऱ्हाडीने केले वार

## शेतात घडला थरार; लोणी बुद्रुक येथील घटना

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** शेती नावाने कर नाहीतर मर असे म्हणत कुऱ्हाडीने वार केले यामध्ये कमला दशरथ पारवे वय ५५ वर्षे ही जागीच ठार झाली तर वृद्ध दशरथ निवृत्ती पारवे हे गंभीर जखमी झाले ही थरारक घटना एक आक्टोंबर च्या सायंकाळच्या सुमारास लोणी येथे घडली

तालुक्यातील लोणी बु. येथील रहिवासी असलेल्या दशरथ निवृत्ती पारवे वय अंदाजे ६० वर्षे यांच्या मालकीची लोणी बुद्रुक शेत शिवारात गट नंबर २०२ मधे १ हेक्टर २२ आर एवढी शेत जमीन असून दशरथ पारवे वय वर्षे ६० आणि त्याची पत्नी कमल दशरथ पारवे वय अंदाजे ५५ वर्षे हे वृद्ध दांपत्य दिनांक १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडे पाच वाजता दरम्यान शेतात खरीप सोयाबीन पिकाची मळणी यंत्रातून करून सोयाबीनचे पोते भरत असताना यशवंता पारवे, आणि त्याची दोन मुलं नामे पंडित, आणि आदिनाथ हे कुऱ्हाडीसह शेतात आले आणि दशरथ यांना तू शेती आमच्या नावावर करत नाही ना मग आता मर असे म्हणत दोन्ही मुलांनी कमल हिच्या आणि दशरथ पारवे यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार केले यामधे कमला हिचा जागीच मृत्यू झाला असून दशरथ पारवे हे देखील बेशुद्ध झाले होते. त्यांना वाशिम येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. सदर घटनेची माहिती लोणी बुद्रुक चे पोलीस पाटील संजीव गाडे यांनी रिसोड पोलीस स्टेशनला दिली. त्यानंतर रिसोड पोलीस तात्काळ घटनस्थळी दाखल झाले दशरथ पारवे दिनांक २ऑक्टोबर रोजी शुध्दीवर आल्यावर असे समजले की त्याचा लहानभाऊ यशवंता आणि त्याच्या दोन मुलांनी त्यांच्या पत्नीचा खून करून, माझ्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करत जीवे मारण्याचा प्रयत्न केल्या बाबतची फिर्याद दिल्याने फिर्यादीच्या रीपोर्ट्रून यशवंता निवृत्ती पारवे वय ५५ वर्षे,पंडित यशवंता पारवे वय २९ वर्षे,आणि आदिनाथ यशवंता पारवे वय २१ वर्षे सर्व राहणार लोणी बुद्रुक तालुका रिसोड यांचे विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून. सदर घटनास्थळी नवनियुक्त पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल,यांनी भेट देऊन तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केल्याने डीबी पथकाने देखील तात्काळ आरोपींचा शोध घेत आरोपींना लोणी बुद्रुक परिसरातून ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे आरोपींना तीन ऑक्टोंबर रोजी न्यायालयात हजर केले असता त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक अनुज तारे (खझड)अपर पोलीस अधीक्षक भारत तांगडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम नवदिप अग्रवाल (खझड) यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक भूषण गावंडे यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस उपनिरीक्षक अशोक गिते, पोलीस हवालदार संजय रंजवे, रतन बावस्कर, पोलीस अंमलदार सुनिल इंगळे, विश्र्वास चव्हाण, गणेश हाके, तसेच डी.बी.पथकातील रवि अढागळे,विनोद घनवट, परमेश्र्वर भोणे, चालक पोलीस अंमलदार प्रभाकर इंगोले, साहेबराव मुखाडे यांनी केली आहे.

## राज ठाकरे दारात पोहोचताच प्रसिद्ध गायिकेने नजर काढून बोटे मोडली, औक्षण करत जोरदार स्वागत

**मुंबई/ प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्राची महागायिका वैशाली माडे यांच्या म्युझिक ॲकाडमी लाँच कार्यक्रमाला हजेरी लावली. राज ठाकरे यांच्या हस्ते म्युझिक ॲकाडमीचे उद्घाटन करण्यात आलं. यामुळे आता सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे एका नवीन भूमिकेत दिसणार आहे. आजपासून वैशाली माडेच्या म्युझिक ॲकाडम ीची सुरुवात सुरू झाली आहे. या आकाडमीमध्ये संगीत शिकणाची इच्छा असणाऱ्यांना संगिताचे संपूर्ण शिक्षण आणि म ार्गदर्शन मिळेल.

वैशाली माडेनी काढली राज ठाकरे यांची नजर

गायिका वैशाली म ाडेच्या संगीत ॲकाडमी लाँचला राज ठाकरे पोहोचले. यावेळी वैशाली माडे यांनी त्यांचे स्वागत केले. वैशाली माडे यांनी राज ठाकरे यांना टिळा लावून त्यांचे औक्षण केले. यानंतर वैशाली माडेने त्यांची बोटं मोडून त्यांची नजर काढली. यावेळी वैशाली माडेने म्हटले की, राज ठाकरे मराठी कलाकाराच्या नेहमी पाठीशी उभे असतात, त्यांनी मलाही नेहमी साथ दिली आहे.

वैशाली माडे हिने यावेळी प्रतिक्रिया देताना म्हटलं की, आज माझी ही म्युझिक ॲकाडमी सुरू होत आहे आणि याचा आनंद आहे.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत ३९३५ अर्जांना मंजुरी; मनपास्तरीय समितीची बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/ प्रतिनिधी :** मुख्यमंत्री वयोश्री योजनेअंतर्गत ३९३५ लाभार्थ्यांच्या अर्जांना मनपा सभागृहात आयुक्त विपीन पालीवाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मनपास्तरीय समिती बैठकीत मंजुरी देण्यात आली.

वयोश्री योजनेसाठी आतापर्यंत ५०६२ अर्ज प्राप्त झाले होते, यापैकी ११२७ अर्ज वयाची अट पूर्ण न करत असल्याने तसेच कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याकारणाने अपात्र ठरले आहेत. योजनेसाठी समाज कल्याण कार्यालय व चंद्रपूर महानगरपालिकेची सर्व कार्यालये येथे अर्ज सादर करण्याची सुविधा करून देण्यात आली होती. त्याचप्रमाणे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा तसेच वयोवृद्ध नागरिकांच्या सुविधेसाठी ज्येष्ठ नागरिक मंच यांच्या ठिकाणी जाऊन विविध शिबिरे घेऊन लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली होती.

मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी त्यांच्या शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने किंवा उपकरणे खरेदी तसेच मानसिक स्वास्थ्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरिता एकवेळ एकरकमी ३ हजार रुपये पात्र लाभार्थ्यांच्या वैयक्तिक आधार संलग्न बचत खात्यात थेट लाभ लवकरच वितरित करण्यात येणार आहे.सदर बैठकीत रमाई आवास योजनेचा सुद्धा आढावा घेऊन पात्र लाभार्थ्यांची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याचे



तसेच शबरी आवास योजनेतील पात्र लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त करून लवकरात लवकर निकाली काढण्याचे निर्देश आयुक्त विपीन पालीवाल यांनी दिले.

याप्रसंगी उपायुक्त रवींद्र भेलावे,सहायक आयुक्त अक्षय गडलिंग,सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी,समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त प्रतिभा भागवतकर,समाज विकास अधिकारी सचिन माकोडे उपस्थित होते.

## राज्य शासनाने सुद्धा बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयातील

# १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला दिली मान्यता

## ४ ऑक्टोंबरला निर्गमित झाला शासन निर्णय, केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली कृतज्ञता

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाण्यासह राज्यातील आठ वैद्यकीय महाविद्यालयाला प्रवेशित मान्यता प्रदान करून दिल्यानंतर राज्य शासनाने सुद्धा प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशला परवानगी दिली आहे या संदर्भातील शासन निर्णय आज ४ ऑक्टोंबरला निर्गमित झाला आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग नवी दिल्ली अंतर्गत मेडिकल असेसमेंट ॲंड रेटीग बोर्ड ( च-ठऊ )यांनी राज्यातील आठ वैद्यकीय महाविद्यालयाला सन २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षापासून एमबीबीएस प्रवेशाला मंजुरात प्रदान केली



यामध्ये बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयाचाही समावेश होता त्यानुसार बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयास प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेश परवानगी महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व आरोग्य द्रव्य विभागाच्या वतीने प्रदान केली आहे १०० विद्यार्थी प्रवेश परवानगी देण्यासंदर्भातील शासन निर्णय आज ४ ऑक्टोंबरला निर्गमित झाला आहे.

### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली कृतज्ञता

केंद्र सरकारच्यावतीने महाराष्ट्रातील आठ वैद्यकीय महाविद्यालयांना प्रत्येकी १०० याप्रमाणे ८०० एमबीबीएस प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रवेश प्रदान करण्यासंदर्भाचे परिपत्रक ३० सप्टेंबरला निर्गमित केले आहे त्यानंतर राज्यातील जनतेच्या हितासाठी कटिबद्ध असलेल्या वेगवान सरकारने तीनच दिवसात एमबीबीएस विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला मान्यता देणारा शासन निर्णय निर्गमित केला त्यामुळे आता राज्यात पूर्वीच्या एमबीबीएस प्रवेश क्षमतेत ८०० व वाढ होऊन विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळणार आहेत त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री जे पी नड्डा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या प्रति केंद्रीय आयुष व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे .

# दिशा महिला उद्योजक तथा बचत गट प्रदर्शनीचा थाटात शुभारंभ

# स्त्रीशक्तीच बदल घडविणार - सुषमाताई अंधारे

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या मातीतून अनेक कर्तृत्ववान महिला घडल्या आहेत. ही भूमी महिलांचा सन्मान करणारी भूमी आहे. तरीही मागील काही काळापासून बुलडाण्यासह राज्यात भयावह स्थिती आहे. नवरात्रोत्सवामध्ये देवीचा जागर सुरू आहे. आता अंबाबाईच महिलांना लढण्याचं बळ देईल त्यामुळे येत्या काळात स्त्रीशक्तीच बदल घडविणार असे प्रतिपादन शिवसेना उ.बा.ठा गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केले आहे.

दिशा जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या वतीने येथे आयोजित तीन दिवसीय महिला उद्योजक मेळावा आणि महिला बचत गट प्रदर्शनीचे राष्ट्रवादी काँग्रेस(श.प.गट) रोहिणी खडसे यांच्या हस्ते उदघाटन झाले. ४ ते ६ ऑक्टोंबर दरम्यान मलकापूर मार्गावरील 'एआरडी मॉल'च्या मागील मैदानात ही प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे.यावेळी प्रदेशकाँग्रेससमितीच्याराज्य प्रवक्ता तथा सरचिटणीस हेमलता पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

रोहिणी खडसे म्हणाल्या की, राज्यकर्ते दीड हजार रुपये देऊन खूप काही दिल्याचा आव आणत आहेत. आजची महिला ही पुर्णपणे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आहे. तरीही दीड हजार देऊन राज्यकर्ते उपकाराची भाषा करतात, अशी खंत खडसे यांनी बोलून दाखविली. त्याचबरोबर जयश्रीताई शेळके यांनी सुरू केलेल्या महिला बचत गटांच्या आर्थिक चळवळीचे कौतुक केले.

आता तळागळातील महिला आपले प्रश्न मांडण्यासाठी एक हक्काची व्यक्ती जयश्रीताई शेळके यांच्याकडे पाहत असल्याची भावना हेमलता पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमावेळी राष्ट्रवादी काँग्रेसशरद पवारगटाच्या जिल्हाध्यक्ष रेखा खेडेकर, बुलडाणा अर्बनचॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष कोमल झंवर, काँग्रेसच्या प्रदेश सचिव स्वाती वाकेकर, मृणाली सपकाळ, मिनल आंबेकर, सरिता एकडे, नंदिनी टारपे, पद्मजा लिंगाडे, अर्चना खेडेकर, मालती शेळके, लक्ष्मी शेळके, कमल बुधवत, हिना सौदागर, महिला उद्योजिका सीताबाई मोहिते यांची विशेष उपस्थिती होती. महिला बचत गटाच्या पदाधिकारी, सदस्यांची तसेच जिल्ह्यातील महिलांची हजारोंच्या संख्येने भरगच्च उपस्थिती होती. उद्घाटन सोहळ्यापूर्वी समाज प्रबोधनकार प्रवीण दवंडे यांचे कीर्तन रंगले. तीन दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.



### २५० हून अधिक स्टॉलने थाटली प्रदर्शनी

बुलढाणा येथे आयोजित तीन दिवसीय बचतगट प्रदर्शनीत जवळपास २५० हून अधिक स्टॉल लावण्यात आले आहेत.खाद्यजत्रा,हस्तकला वस्तू हस्तशिल्प,घरगुती पदार्थ व मसाले,महिला गृहउद्योग उत्पादित वस्तू,महिलांचा स्नेहमिलन सोहळा,महिलांचा आनंदोत्सव,महिला उद्योजकांचा गौरव समारंभ असे या प्रदर्शनीचे वैशिष्ट्ये आहेत.महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्यादृष्टीने ही बचटगट प्रदर्शनी महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

### समाजप्रबोधनकार प्रविणजी दवंडे यांचे किर्तन ठरले आकर्षण

बचतगट प्रदर्शनीत दोन दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.प्रसिद्ध समाजप्रबोधनकार पवनजी दवंडे यांचा प्रबोधनात्मक किर्तनाचा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरले. शिव,फुले,शाहू,आंबेडकर यांच्या विचारांची पेरणी त्यांनी आपल्या वाणीतून केली.त्यांच्या कीर्तनाला महिला आणि तरुणाईचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

### बंजारा भगिनींनी लेंगी नृत्याने केले मान्यवरांचे स्वागत

प्रदर्शनीवेळी मान्यवरांचे आगमन होताच बंजारा भगिनींनी त्यांचे पारंपरिक लेंगी नृत्य करुन मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सर्व महिला त्यांच्या पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होत्या.

## विविध वृत्त...

### बेलगाव येथील विद्यालयात महात्मा गांधी आचार विचार व संस्कार परीक्षा



दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**डोणगाव :** गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्याकडून दरवर्षी घेण्यात येणारी आचार, विचार, आणि संस्कार परीक्षा यावर्षी येथून जवळच असलेल्या बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालयात दि.२ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेचे आयोजन मुख्याध्यापक दीपक प्रकाश कुटे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले होते. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल २७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांच्याकडून दरवर्षी आचार विचार आणि संस्कार या विषयावर परीक्षा घेऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे आचार विचार व संस्कार युवा पिढीला माहीत व्हावे या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या उचितता साधून बेलगाव येथील महाजी दर्याची पाटील माध्यमिक विद्यालयात सदर परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचे समन्वयक म्हणून विनोद अशोक मेटांगळे यांनी काम पाहले. सदर परिक्षेच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक कावरखे, वानखेडे, गिते, जायभाये, गायकवाड, बागुल तर शिक्षकेतर कर्मचारी विजय दाभाडे, गजानन देशमुख यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनींनी परीश्रम घेतले.

### कृषी योजनेचा लाभ घेऊन शेतकऱ्यांनी प्रगती साधावी ; आ. संजय रायमुलकर, तालुक्यातील २१३० शेतकऱ्यांना फवारणी पंपाचे वाटप



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/ प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासन विविध योजना राबवित आहे.कृषी विभागही शेतकऱ्यांचा विकास डोळ्यासमोर ठेवून शेतीशी निगडित योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करीत आहे. या योजनाचा शेतकऱ्यांनी लाभ घेऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन मेहकर मतदार संघाचे आ. संजय रामुलकर यांनी केले.ते राज्य शासनाच्या कपाशी ,सोयाबीन व इतर तेलबिया पिकांच्या उत्पादकता व मूल्य साखळी विकास विशेष कृती योजनेअंतर्गत फवारणी पंप वितरण कार्यक्रमात बोलत होते.

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत दि.४ ऑक्टोबर रोजी कृषी विभागाच्या वतीने या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, गट विकास अधिकारी संदीप मेटांगळे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश वाळूकर, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, शहर प्रमुख जयचंद बाठीया, रविराज रहाटे, मगर, तालुका कृषी अधिकारी किशोर काळे आदी मान्यवरांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होती.

यावेळी शेतकऱ्यांना पीक फवारणीसाठी बॅटरीवर चालणाऱ्या फवारणी पंपाचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमात पाहुण्यांचे स्वागत किशोर काळे, किरण पडवळकर, उद्धव काळे, विजय राजुरकर यांनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. संजय रायमुलकर म्हणाले की ,कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठीच्या योजना प्रभावीपणे राबविलेल्या आहेत. शेतकऱ्यांनी जागरूक राहून कृषी विभागाच्या विविध योजनांची वेळोवेळी माहिती घ्यावी व त्याचा लाभ घ्यावा. त्यासाठी कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी त्यांच्या मदतीला तत्पर असतात. मेहकर, लोणार तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम करण्यात आली असून अपात्र असलेल्या इतर शेतकऱ्यांनाही पीक विम्याची रक्कम निश्र्चितपणाने मिळेल, असेही ते म्हणाले. विरोधक याबाबत अपप्रचार करत असून कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत माझ्यासह जिल्ह्यातील आमदार व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी चर्चा करून आग्रही भूमिका घेतल्यानंतर अपात्र शेतकऱ्यांनाही पीक विम्याची रक्कम दिली जाईल, असे त्यावेळी धनंजय मुंडे यांनी जाहीर केले होते. त्याप्रमाणे रक्कम देण्यातही आली असून उर्वरित शेतकऱ्यांनाही ती मिळेल , असे आमदार संजय रायमुलकर म्हणाले. तसेच पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कृषी रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल विठ्ठल धांडे यांचा यावेळी आ. रायमुलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुधाकर कंकाळ, भूषण लहाने, संतोष गायकवाड, विठ्ठल लहाने,अंकुश सोळंकी, सीमा अंभोरे, लक्ष्मी जंजाळ आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद डोंगरे यांनी केले. कार्यक्रमाला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंत्रालयातील जाळ्या पाहूनच आमदारांनी बहुतेक उड्या मारल्या असाव्यात; संजय राऊत यांची टीका

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/ प्रतिनिधी :** आरक्षणाच्या प्रश्न संदर्भात नरहरी हिरवळ यांनी मंत्रालयात उडी मारून आंदोलन केल्याची घटना घडल्यानंतर त्याबाबत संजय राऊत यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे, विधानसभेची मुदत संपत आली असून राज्यातील मिंदे सरकार या सगळ्यांच्या पाठिंब्यावर टिकून आहे, मात्र या सरकारमध्ये किती अस्वस्थता आहे. हे परत एकदा दिसले आहे ज्या पद्धतीने या सरकारने आरक्षणाचा विषय हाताला मराठा समाज असेल धनगर समाज असेल यांना यांना एकमेकांच्या विरोधात झुंजत ठेवण्याचा काम या सरकारने केला आहे.

आज या आमदारांना मंत्रालयामध्ये वरतून उड्या मारण्याची वेळ आली. सुदैवाने या ठिकाणी जाळ्या लावल्या आहेत ती जाळी पाहूनच त्यांनी उड्या मारल्या असतील, मात्र या आमदारांनी ज्या उड्या पक्षांतर करून मारल्या आहेत त्या अधिक धोकेदायक आहेत त्यांनी ह्या अशा उड्या मारल्यामुळेच आज मंत्रालयात उड्या मारण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्यामुळे त्यांनी नक्कीच आपापल्या समाजाची फसवणूक केली आहे. एक घटना बाह्य सरकार या आमदारांमुळेच महाराष्ट्रात आले या सरकारला कोणतीही दिशा नाही.




हर्षवर्धन पाटलांचा प्रवेश हा पवार साहेबांच्या राष्ट्रवादीतील विषय आहे हर्षवर्धन पाटील हे जेव्हा भाजपात गेले तेव्हा आम्हा सगळ्यांना धक्का बसला होता, मात्र त्यांना शांतच झोप लागावी म्हणून ते तिकडे गेले इडी सीबीआय यांचा कोणताही त्रास होणार नाही म्हणून ते भाजपात गेले, मात्र कदाचित त्यांना तिथे झोप लागली नसावी, मात्र ते आता महाविकास आघाडी घेत आहेत आम्ही त्यांना खात्री देतो की या ठिकाणी त्यांना शांत झोप लागेल, महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे हात बळकट करण्यासाठी ते असल्याची प्रतिक्रिया संजय राऊत यांनी व्यक्त केली आहे.

सावरकर चॅरिटेबल ट्रस्टला जागा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतर याबाबत संजयराव त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली असून अशा पद्धतीच्या चारिटेबल ट्रस्ट या कोणाच्या आहेत क्रांतिकारकांच्या नावाने सुरू करण्यात आलेले आहेत याचे सूत्रधार कोण आहे हे पहावे लागेल, क्रांतीकारकांच्या नावाने ट्रस्ट सुरू करून त्या जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याची प्रतिक्रिया संजय राऊत यांनी व्यक्त केली आहे.

## ६७ वर्षाच्या वृध्दाने केला ३० वर्षीय युवतीवर अत्याचार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** तालुक्यातील धक्कादाय घटना ६७ वर्षाच्या वृद्धाने ३० वर्षीय मतिमंद युवतीवर बलात्कार केल्याची घटना गुरुवारी ३ऑक्टोंबर रोजी घडली आहे. याप्रकरणी दारव्हा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून संबधित आरोपीला तातडीने अटक केली आहे.



दारव्हा पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार ३ ऑक्टोंबर रोजी तालुक्यातील हातोला येथील ३० वर्षीय मतिमंद युवतीच्या घरात वसंता वंजारी वय ६७ वर्ष रा.हातोला हा नराधम घुसला मतिमंद युवती घरात एकटी असल्याने व दुपारची वेळ असल्याने युवतीच्या असहाय्यतेचा फायदा घेत युवतीवर जबरदस्ती करून लैंगिक अत्याचार केला दरम्यान आरोपीस पिडीतेचे घरात शिरतांना गावातील एका महिलेने पाहील्याने तीने तात्काळ पिडीतेच्या आईला ही माहीती दिली. पिडीतेची आई घरी आली असता आरोपी नाराधन हा तिच्या घरात पिडीते सोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसला पिडीतेच्या आईने आरडा ओरड करताच गावातील काही नागरीक तेथे धावत आले त्यावेळी घरात असलेला आरोपी लोकांना पाहुन पळून गेला. संध्याकाळी पिडीत मुलीसह तिच्या आईने दारव्हा पोलीस स्टेशन गाठले पोलिस निरीक्षक विलास कुलकर्णी यांनी घटनेचे गांभिर्य ओळखुन पिडीतेच्या आईच्या तक्रारी वरून गुन्हा विविध कलमानुसार गुन्हा दाखल केला. व नराधम आरोपी यास बेड्या ठोकल्या सदर घटनेचा अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी चिलुमुला रजनीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विलास कुलकर्णी,पोउपनि प्रतिभा मेश्राम ,पोहचवा महेंद्र भुते,पोना सुरेश राठोड,पोकॉ युवराज चव्हाण, अमोल सारोख,चालक किरण राठोड हे करीत आहेत.

## नवीन आरटीओ कार्यालय मंजूर; खामगाव जिल्हा होण्याच्या दृष्टीने आणखी एक पाऊल

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/ प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्याचे विभाजन करून खामगाव जिल्ह्याची नव्याने निर्मिती व्हावी अशी मागणी जुनी आहे तसा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून धूळखात पडून आहे. मात्र राज्यातील नव्या जिल्ह्यांच्या निर्मितीचा मार्ग अजूनही काही मोकळा झालेला नाही. शासनाचे खामगाव जिल्ह्या होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या असून गुरुवारी खामगाव येथे एम.एच ५६ या नोंदणी क्रमांकासह उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) स्थापन करण्याबाबत शासन निर्णय झाला आहे. त्यामुळे आता एम एच २८ नव्हे तर एम एच ५६ लागणार आहे. या घोषणेमुळे याभागाचे भाजपचे आमदार ड.आकाश फुंडकर यांच्या मागणीला यश प्राप्त झाले आहे.

बुलढाणा जिल्हा हा १३ तालुक्याहक असून घाटावर ७ तर घाटाखाली ६ तालुके आहेत. यामध्ये घाटाखालील नागरिकांना आपल्या वाहनांच्या नोंदणीसाठी बुलढाणा शहरात असलेल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात जाने म्हणजे संपूर्ण दिवस वाया जाने आणि २०० कि.मी. चा प्रवास करावा लागत होता. घाटाखालील खामगाव, शेगाव, नांदुरा, मलकापूर, जळगाव जामोद आणि संग्रामपूर या सहा तालुक्यांसाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व्हावे यासाठी खामगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड.आकाश फुंडकर यांनी खामगाव येथे आरटीओ कार्यालय होण्याबाबत विधानसभेत आवाज उचलून सरकारकडे सतत पाठपुरावा सुरू ठेवला होता. अखेर आज शासनाने उपप्रादेशिक कार्यालयाला मंजूरी दिल्यामुळे फुंडकर यांच्या मागणीला यश आले आहे. यानंतर आता विधानसभा निवडणुका तोंडावर आलेले असताना महायुती सरकारने बहुतांशी आमदारांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून पाउले उचललेली आहेत. त्यानुसार आता शासन निर्णयानुसार खामगाव, जि. बुलढाणा येथे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी दर्जाचे MH ५६ या नोंदणी क्रमांकासह नवीन कार्यालय सुरु करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

# डोणगाव परिसरात अवैध दारू विक्रीला उधाण, पोलीस प्रशासनाची चुपी


## परवानाधारक दुकानदारांचे राज्य उत्पादन शुल्क विभागाला निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/विशेष प्रतिनिधी :** पोलीस प्रशासनाच्या अर्थपूर्ण दुर्लक्षामुळे डोणगाव व डोणगाव परिसरात अवैध दारू विक्री खुलेआम सुरू आहे. या अवैध धंद्यात पोलीस प्रशासनाचेच हात ओले होत असल्याने कारवाई कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी डोणगाव परिसरात अवैध दारू विक्रीला उधाण आले आहे. तरी डोणगाव व परिसरातील अवैध दारू विक्री तात्काळ बंद करावी,अशी मागणी डोणगाव बार असोसिएशनचे अध्यक्ष सुनिल शितलप्रसाद जैस्वाल यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग अधीक्षक बुलढाणा यांना निवेदनाद्वारे केली आहे



पोलीस अधीक्षक व राज्य उत्पादन शुल्क विभाग बुलढाणा यांच्याकडे केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, डोणगांव येथील परवानाधारक दारु विक्रेते आहोत. मागील बऱ्याच दिवसापासुन डोणगांव व डोणगांव परिसरामध्ये काही हॉटेल, ढाबे व भोजनालयामध्ये खुलेआम अवैध देशी व विदेशी दारु विक्री केल्या जात आहे.ग्राहकांना बसुन दारु पिण्याची मुभा दिली जात आहे. अनेक अवैध दारु विक्री करणारे हे निकृष्ट व बनावट दारु विकत असल्याचे बोलल्या जात आहे. या अवैध दारू विक्रीमुळे शासनाचा लाखो रुपयाचा उत्पादन शुल्क बुडविल्या जात आहे.तरी या अवैध व नियमबाह्यरित्या हॉटेल, ढाबे व भोजनालयातील दारु विक्रेत्यांवर कार्यवाई करावी व शासनाचा बुडणारा लाखो रुपयाचा शुल्क वाचविण्यात यावा. अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाच्या प्रतिलिपी बुलढाणा जिल्हाधिकारी,उपविभागीय पोलीस अधिकारी मेहकर, डोणगाव येथील पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना दिल्या आहेत. निवेदनावर सुनिल शि. जयस्वाल यांच्यासह परवानाधारक दारू विक्रेत्यांच्या साक्षर आहेत.



### दारूच नव्हे सर्व अवैध धंदे खुलेआम

डोणगाव व डोणगाव परिसरात अवैध दारू विक्री यासह वरली, मटका, जुगार आदी अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत. हा सर्व प्रकार दिवसाढवळ्या सुरू असताना याकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने अवैध धंदे करणाऱ्यांना कोणाची भीती उरली नाही. परिणामी गावात दारू पिणाऱ्या युवकांची संख्या वाढली आहे. या दारूमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे अवैध दारू विक्री व इतर अवैध धंदे तात्काळ बंद करावे, अशी मागणी डोणगाव परिसरातील सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.